**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, MAR-APR, 2019, VOL- 6/50*

# ठाणे जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळांची सध्य:स्थिती

**विजय कोवे[1] & विनोद रायपुरे[2], Ph.D.**

***[1] पी.एच.डी.संशोधक (स्कॉलर) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव***

***[2] (मार्गदर्शक) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**I)** प्रस्तावना :- स्वातंत्रोत्तर काळात आदिवासी लोकांच्या मुलभूत सामाजिक हक्कांबाबत घटना समितीपुढे समस्या निर्माण झाल्या. घटना समितीच्या उपसमितीच्या शिफारसी नुसार भारतीय राज्य घटनेत आदिवासी लोकांसाठी काही विषेश तरतुदी करण्यात आल्या.शैक्षणिक विकासा संबंधीची तरतूद हि त्या पैकीचएक महत्वाची तरतूद आहे. राज्यामध्ये आदिवासी वाहूळ क्षेत्रात आदिवासी लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी १९७२ मध्ये आदिवासी विकास संचालनालयाची स्थापना झाली. या संचालनालयाच्या वतीने शासनाने आश्रमशाळा समूह योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. या योजनेचा प्रमुख उद्देश म्हणजे डोंगराळ आणि दुर्गम भागातील आदिवासी लोकांचा आर्थिक सामाजिक आणि शैषणिक विकास करणे आणि त्या दृष्टीने आश्रमशाळा सुरु करणे हा होता. वास्तविक आदिवासी जमातीतील मुला-मुलीं साठी राज्यात १९५३ पासूनच आश्रमशाळा योजना राबविण्यात येत आहे. महात्मा गांधींकडून प्रेरणा घेऊन ठक्कर बाप्पा यांनी हि योजना सर्वप्रथम महाराष्ट्रात

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सुरु केली. आदिवासी लोकांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते. आणि त्यांच्यातील अज्ञानामुळे त्यंच्या सर्वांगीण विकासात बरेच अडथळे निर्माण होत होते. आदिवासी प्रौढांसाठी साक्षरतेच्या योजना जरी अंमलात आणल्या तरी नव्या पिढीच्या आदिवासींसाठी काही शैक्षणिक योजना राबवणे क्रमप्राप्त होते, म्हणून आदिवासींच्या शैक्षणिक विकासाचा पाया म्हणून काही शैक्षणिक योजना शासनाने प्राधान्यक्रमाने सुरु करण्यात आल्या. कोणताही आदिवासी विध्यार्थ्यांस सरकारी व सरकार मान्य शिक्षण संस्थेत प्रवेश नाकारला जाणार नाही आणि मोफत प्रवेश मिळेल अशी व्यवस्था करून मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. कनिष्ठ व वरिष्ठ महाविध्यालयीन स्तरावर आदिवासींसाठी शिष्यवृत्यांच्या योजना लागू करण्यात आल्या. शिक्षणासाठी बाहेर गावाहून येणाऱ्या आदिवासी मुलांसाठी प्रमुख शैक्षणिक केंद्रात शासकीय वसतिगृहे सुरु केली. त्याच बरोबर स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांना अनुदान देण्यात आले. आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळांची योजना राज्यातील विविध आदिवासी बहुल भागात राबवण्यात आली. हि योजना सर्वप्रथम शिक्षण संचालनाच्या वतीने राववण्यात आली. आश्रमशाळा, प्राथमिक व माध्यमिक स्तरापर्यंत आहेत. तसेच स्वयंसेवी संस्थानच्यावतीने चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळांना त्यांच्या खर्चाच्या ९०% पर्यंत रक्कम अनुदान

म्हणून देण्यात येते. प्रस्तुत अभ्यास हा ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या बाबतीतला आढावा आहे.

**II)** <u>अभ्यासाचे महत्व</u>:- ठाणे जिल्ह्यात काही तालुके हे आदिवासी बहुल भागात आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्यातील बिगर आदिवासी पुरुष व स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७९.३% आणि ६६.४%इतके आहे. आदिवासी पुरुष व स्त्रीयामधील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ४०.५% आणि १७.२% आहे. राज्यस्तरावर बिगर आदिवासी पुरुष व स्त्रीयामधील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८२.४% आणि ६९.३% आहे. तर आदिवासी पुरुष व महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ५२.२% व २७.४% इतके आहे. राज्याच्या तुलनेत आदिवासी पुरुष व महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असल्याचे आढळून येते. आदिवासींमधील निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्याच्या हेतूने त्यांच्या शैक्षणिक विकास करण्याच्या हेतूने शासनाने आश्रमशाळा योजना अंमलात आणली. ठाणे जिल्ह्यात या योजनेमुळे आदिवासींच्या शैक्षणिक विकासात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचे काय योगदान आहे याचा आढावा घेणे महत्वाचे ठरते.

**III)** <u>अभ्यासाची उद्दिष्टये</u> :-

i) ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळांचे आदिवासींच्या शैक्ष णक  वकासातील योगदानाचा आढावा घेणे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

ii) ठाणे जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची संख्या, गाव आ ण तालुका नुसार माहिती घेणे.

iii) ठाणे जिल्ह्यातील प्राथ मक व माध्य मक स्तरावरील आदिवासी मुला-मुलींची पटसंख्या अभ्यासणे.

**IV)** माहिती संकलन पध्दती :- प्रस्तुत अभ्यास पूर्णपणे दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम माहितीसाठी विविध शासकीय अहवाल, तज्ञ संशोधकांच्या अहवालांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**V)** अभ्यासा संबंधित प्रसिद्ध साहित्याचा आढावा :-

१) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग,(२००९) यांच्या वतीने महाराष्ट्रातील आश्रमशाळांमध्ये आदिवासींच्या शिक्षणाची व्यवस्था कशी आहे शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचा आदिवासींच्या शैक्षणिक विकासात काय योगदान आहे या बाबत सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षनात्मक अभ्यासाद्वारे आश्रमशाळांमधील (शासकीय व अनुदानित) शिक्षणाचा दर्जा, उपलब्ध शैक्षणिक सोयी सुविधा, भौतिक सोयी सुविधा, विध्यार्थ्यांना पुरवण्यात येणारे शैक्षणिक साहित्य या बाबत परीक्षण केले. या परीक्षणाद्वारे असे लक्षात आले कि बहुतांशी आश्रमशाळांच्या इमारतींचे बांधकाम पक्के व दर्जेदार नाही. बहुतांशी आश्रमशाळांचे बांधकाम अपुरे असल्याचे

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आढळले. साहजिकच अशा परिस्थितीचाप्रतिकूल परिणाम आदिवासी विध्यार्थ्यांच्या पटसंख्येवर, त्यांच्या शैक्षणिक विकासावर झाला असल्याचे निदर्शनास आले.

२) मंगला घोडे, (१९९४), यांनी महाराष्ट्र राज्यातील २१ जिल्ह्यांमधील एकंदरीत ५० शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचा अभ्यास केला. या अभ्यासावरून असे दिसून आले कि, वाहुतांशी शाळांच्या इमारती कच्या बांधकामाच्या आहेत. बहुतांशी शाळा भाडेतत्वावरील इमारती मध्ये सुरु आहेत. काही शाळांमध्ये विध्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण हे ६०% हून अधिक आहे असे लेखिकेच्या निदर्शनामध्ये आले. सदर अभ्यासाद्वारे ठाणे, पुणे, जळगांव, नागपूर व अकोला या जिल्ह्यांमधील आश्रमशाळेतील विध्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. विशेषतः मुलींच्या बाबतीत, शाळा सोडण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून आले. बहुतांशी शाळांमध्ये भौतिक सुविधांचा अभाव अस,यामुळे आदिवासी विध्यार्थ्यांच्या पटसंख्येवर आणि त्यांच्या शैक्षणिक विकासांवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे लेखिकेने नमूद केले आहे.

३) के. एम. धोपटे, (२००७), यांनी नागपूर जिल्ह्यातील कवडस व हरदोली या गावातील शासकीय आदिवासी पोस्त बेसिक आश्रमशाळांमध्ये आदिवासी विध्यार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या विविध सुविधांच्या संधर्भात अभ्यास केला आहे. या सोयी सुविधांच्या बाबत विद्यार्थ्यांची मते काय आहेत हे हाणून घेण्याचा प्रयत्न

लेखकाने केला आहे. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या अडचणींना समोर जावे लागते आणि त्याचा त्यांच्या शाळेतील उपस्थितीवर व शैषणिक विकासावर काय परिणाम झाले आहेत याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. मातृभाषा व शिक्षांची माध्यम भाषा यात तफावत असल्यामुळे बहुतांशी आदिवासी विद्यार्थ्यांना कठीण विषयाचे आकलन व्यवस्थितपणे होत नसल्याचे सदर अभ्यासाद्वारे निदर्शनास आले.

४) आर. डी. खरोसेकर, (२००१), यांच्या मते, शिक्षणामुळे आदिवासी लोकांची दृष्टी व्यापक आणि विशाल होऊ शकेल आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल आणि या सर्व प्रक्रियात आश्रमशाळांचे फार मोठे योगदान आहे. लेखकाने पुढे असे मत व्यक्त केले आहे कि, समाजातील वंचित वर्गातील लोकांना विविध शैषणिक सोयी सुविधा व सवलती आश्रमशाळेच्या माध्यमातून उपलब्ध झाल्यास त्यांच्या शैक्षणिक विकासाचे उद्दिष्ट सहजपणे सध्या होऊ शकेल, आणि य सवलती सोयो सुविधा आदिवासींपर्यंत पोहोचल्या तरच त्यांना शिक्षणाच्या प्रकुख प्रवाहात सामाऊन घेता येऊ शकेल आणि आश्रमशाळांच्या माध्यमातूनच हे सध्या होऊ शकेल असे लेखकाला वाटत.

## VI) <u>ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचे योगदान -</u>

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

पुढील तक्त्यात ठाणे जिल्ह्यातील अनुदानित/खाजगी आश्रमशाळांची संख्या, तालुका आणि गावांची माहिती नमूद केली आहे.

तक्ता क्र. १

ठाणे जिल्ह्यातील अनुदानित/खाजगी आश्रमशाळांची संख्या, गाव व तालुका (२०१८)

| अ.क्र. | आश्रमशाळा | तालुका | शाळांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | भातसाई, गोठेघरवाफा, गांडूळवाड, चिंध्याचीवाडी | शहापूर | ०४ |
| ०२ | शिरोळे, भिवाळी रावत्याचापाडा | भिवंडी | ०३ |
| ०३ | खडावली | कल्याण | ०१ |
| ०४ | तळवली, वाल्हीवरे, झापवाडी | मुरबाड | ०३ |
| ०५ | कराव (वांगणी), लव्हाळी | अंबरनाथ | ०२ |
| | एकूण | | १३ |

एकूण १३ आश्रमशाळा ठाणे जिल्ह्यात कार्यात आहेत. केवळ ठाणे जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांकडून या आश्रमशाळा चालवल्या जात नाहीत तर मुंबई आणि कोल्हापूर येथील शैक्षणिक संस्थांकडून देखील आश्रमशाळा चालवल्या जात आहेत. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात केवळ ठाणे जिल्ह्यातीलच

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

शैक्षणिक संस्थांचे योगदान नसून इतर जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांचे देखील भरीव योगदान आहे. वर उल्लेखलेल्या आश्रमशाळांपैकी शहापूर तालुक्यात सर्वात जास्त आश्रमशाळा (४) कार्यरत आहेत. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात शासकीय आश्रमशाळांचे सुद्धा खूप मोठे योगदान आहे.

१९७२ पासून शासकीय आश्रमशाळा योजना अंमलात आली. ठाणे जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांची माहिती पुढील तक्त्यात नमूद केली आहे.

<u>तक्ता. क्र. २</u>

ठाणे जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांची संख्या, गाव व तालुका (२०१८)

| अ.क्र. | आश्रमशाळा | तालुका | शाळांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | टेंभा, दहागाव, भातसा, आंबीवली, खुटल, टाकीपठार, पिवळी, पेंढरधोळ, शेणवे, शिरोळ, अघई, डोळखांब, सुसरवाडी, कोठारे, विहीगावमाळ | शहापूर | १५ |
| ०२ | चिंधीपाडा, भीनार, पिसे, पिळझे | भिवंडी | ०४ |
| ०३ | मढ, मोरोशी, सासणे, माळ | मुरबाड | ०४ |
| | एकूण | | २३ |

सध्या ठाणे जिल्ह्यात एकूण २३ शासकीय आश्रमशाळाकार्यरत आहेत. आदिवासी मुलांना पुढील शिक्षणाची संधी मिळावी म्हणून काही शासकीय

आश्रमशाळांना जोडूनच पोस्ट बेसिक आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. कारण बहुतांशी आश्रमशाळांमध्ये इयत्ता ७ वी पर्यंतचेच शिक्षण मिळते. पोस्ट बेसिक आश्रमशाळांमध्ये इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. आणि याचा फायदा अनेक आदिवासी मुलांना आज होत आहे. या शाळांव्यतिरिक्त आदिवासी मुलांसाठी शासकीय वसतिगृहांची सोय करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे काही खाजगी स्वयंसेवी संस्थांनी चालवलेली वसतिगृहे देखील आहेत. थोडक्यात शासकीय स्तरावरून आणि खाजगी शैक्षणिक संस्थांच्या स्तरावरून ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागात आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले गेले; असे निदर्शनास आले.

सध्य: परिस्थितीत ठाणे जिल्ह्यातील विविध शासकीय व अनुदानित खाजगी आश्रमशाळांमध्ये प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी मुलांचे प्रमाण वाढत असले तरी पुढे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या आदिवासींची संख्या खूपच कमी कमी होत जाते असे दिसून येते. जेमतेम ३०% विध्यार्थी माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेऊ शकतात. त्यातही मुलींच्या माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण अगदीच अत्यल्प आहे. शासकीय अहवालानुसार ठाणे जिल्ह्यातील आदिवासी मुलांच्या प्राथमिक शिक्षण स्तरावरील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील पटसंख्ये बाबतची सांख्यिकीय माहिती

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

पुढील दोन तक्त्यांमध्ये नमूद केली आहे. ही सांख्यिकीय माहिती सन २०१८मधील आहे.

तक्ता क्र.३

ठाणे जिल्ह्यातील अनुदानित/खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील इ.१ ली. ते इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या एकूण विध्यार्थी विध्यार्थीनींची संख्या (२०१८)

| अ. क्र. | अनुदानित/खाजगी आश्रमशाळा | | | शासकीय आश्रमशाळा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | विध्यार्थी | विध्यार्थी नी | एकूण | विध्यार्थी | विध्यार्थीनी | एकूण |
| ०२ | ३०५१ | २२१३ | ५२६४ | ४७०८ | ४४८८ | ९१९६ |

ठाणे जिल्ह्यापुरता विचार करायचा झाला तर, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागात आश्रमशाळा योजना बहुतांशी प्रमाणात यशस्वी झाली असे दिसून येते, आदिवासींना शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात आदिवासी पालकांना मुलांना शाळेत पाठवण्यास उधुक्त करण्यास आश्रमशाळांची नेहमीच महत्वाची भूमिका ठरली आहे हे या वरून आधोरेखीत होते.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अनेक कारणांमुळे आदिवासी मुलींना जेमतेम प्राथमिक शिक्षण स्तरापार्यांतच पोहोचता येते. परंतु, शासकीय आश्रमशाळा योजना स्वयंसेवी संस्थांच्या योजना, विविध शैक्षणिक सुविधांच्या माध्यमातून आदिवासी लोकांमध्ये मुलींच्या शिक्षणाच्या महत्वा बाबत जाणीव, जागृती निर्माण होत असल्याने आज बहुतांशी प्रमाणात आदिवासी मुली सुद्धा माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत आणि या सर्व प्रक्रियेत आश्रमशाळांचे फार मोठे योगदान आहे.

**VII)** निष्कर्ष- शासन हे समाजातील दुर्बल घटकांच्या विशेषतः अनुसूचित जाती-जमातीयांचे शैषणिक व आर्थिक हितसंवर्धन करेल आणि सामाजिक अभ्यास आणि इतर सर्व प्रकारच्या शोशानांपासून त्यांचे संरक्षण करेल असे भारतीय संविधानातील राज्य धोरणांच्या निदेशकतत्वा बाबत अनुच्छेद ४६ मध्ये नमूद करण्यात आले आहे. आदिवासींच्या शैक्षणिक समस्यांचे प्रभावीपणे निराकरण करण्याच्या दृष्टीने आदिवासी मुलांना शैक्षणिक सुविधा मिळावी मोफार निवास व भोजनाची सोय व्हावी म्हणून शासनाने आश्रमशाळा योजना अंमलात आणली. या योजनेच्या अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या काळात शासनानी उत्प्रेरकाची भुमिका घेऊन आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी अनेक प्रयत्न केले. या सर्व प्रयत्नांना शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचा फार मोठा वाट आहे हि बाब नाकारून चालणार नाही.

आदिवासी पाड्यांच्या/गावांच्या जवळपास आश्रमशाळा सुरु झाल्यामुळे अधिकाधिक आदिवासी मुलांना शिक्षणच लाभ घेता येऊ लागला आहे. त्याच बरोबर औद्योगीकरण, नागरीकरण, शिक्षणाप्रती आदिवासींचा बदलता सकारात्मक दृष्टीकोन, आश्रमशाळेतील शिक्षकांकडून केली जाणरी शैक्षणिक जाणीव, जागृती, स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांकडून केले जाणारे प्रयत्न इत्यादी बाबींचा देखील आदिवासींच्या शैक्षणिक विकासावर सकारात्मक परिणाम होत आहे. ठाणे जिल्ह्यातील दळणवळणाच्या अधिक सुविधा उपलब्ध असल्याने आदिवासी बहुल भागात आश्रमशाळा सुरु करणे आणि ती चालवणे सहज शक्य असल्यामुळे आदिवासींच्या शैक्षणिक विकासावर अनुकूल परिणाम झाल्याचे उपलब्ध सांख्यिकीय माहितीच्या आधारे दिसून येते. वास्तविक ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासाचे कार्य हे आव्हानात्मक आणि गुंतागुंतीचे आहे, परंतु हि आव्हाने पेलत गुंतागुंतीच्या समस्या सोडवत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांनी ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात मोठे योगदान दिल्याचे दिसून येते.

<u>संधर्भ</u>

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग अहवाल, (२००९), भारत सरकार.

मंगला घोडे, (२००३), “स्टेटस ऑफ आश्रमस्कूल इन महाराष्ट्र,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड २२-२६.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

के. एम. धोपटे, (२००७), “शासकीय आश्रमशाळा - एक अभ्यास,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड २८-२९.

आर. डी. खरोसेकर, (२००१), “आदिवासींच्या शैक्ष णक संबंधीचा दृष्टीकोन,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड २०.

रा. बा. मोकाशी, (२००१), “शासकीय आश्रमशाळांचे व्यवस्थापन व शैक्ष णक प्रगती आणि त्या वरील उपाय,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड २०.

द. अ. मरवल्ली, (२००१), “आदिवासींचे शक्षण : काही समस्या,” शक्षण आ ण समाज, भारतीय शिक्षण संस्था प्रकाशन, पुणे.

के. टी. हंबीर, आणि एन. डी. देशमुख, (२००७), “आदिवासी वध्यार्थ्यांचे शक्षण : एक दृष्टीकोन,” हाकारा (त्रैमा सक), अंक. ३९.

बी. व्ही. भानू, (१९९५), “शासकीय आश्रमशाळेतील गळतीची समस्या : एक अभ्यास,” शक्षण आ ण समाज, भारतीय शक्षण संस्था प्रकाशन, पुणे. अंक २३.

महाराष्ट्र शासन, (२००७), “ठाणे जिल्हा आ र्थक-सामाजिक समालोचन”.

सु. गो. तपस्वी, (२०१०), “ वकासाची आशा,” ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

*N. N. Mathur, (2007), “Tribal Education: Past Present and Future,” Shiva Publications, Udaipur, Rajasthan.*

*S. B. Patel, (1991), “Tribal Education in India,” Mittal Publications, New Delhi.*

*M. K. Bhagwat, (2010), “Ashram school run by NGOs,” Economic and Political Weekly.*

एल. जी. काडगोळे, (२००८), “शासकीय आश्रमशाळांमध्ये वध्यार्थ्यांबाबत प्रकर्षाने जाणवणाऱ्या समस्या,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड २६.

प्रकाश वाणी, (१९९७), “आश्रमशाळा : यशस्वीततेची चढती कमान,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड १६.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

एस. टी. जोशी, (२००४), “ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्ष णक  वकासाचा आढावा,” हाकारा, अंक.२९.

व्ही. बी. पुरंदरे, (२००७) ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळांची प्रगती व समस्या,” ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड. २७.

एन. आर. पारसनिस, (२००७) “ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्ष णक  वकासाचा आढावा,” संशोधन चेतना, खंड.३.

सी. एम. पाटील, (२०१४), “ठाणे जिल्ह्यातील आदिवासी  शक्षणाची स्थिती व प्रसार : एक चिकीस्तक अभ्यास,” संशोधक चेतना, खंड. १०.